# महाराष्ट्र शासन

क्र.मअसे/२०१५/४६/१५४४

**अग्निशमन सल्लागार यांचे कार्यालय,**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रुझ-पूर्व, मुंबई-४०० ०९८.

दूरध्वनी: २६६७७५५५
फॅक्स : २६६६०२८७
Email : supdt@mahafireservice.gov.in
Website: www.mahafireservice.gov.in

दिनांक : ३० सप्टेंबर, २०१५

**प्रति,**

आयुक्त, सर्व महानगरपालिका,
जिल्हा प्रकल्प अधिकारी (नगरपरिषद), सर्व जिल्हाधिकारी कार्यालय,
मुख्य अग्निशमन अधिकारी, एमआयडिसी/सिडको/विशेष नियोजन प्राधिकरणे.
मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा/ नगरपंचायती.

विषय : राज्यातील शासकीय/निमशासकीय/सार्वजनिक उपक्रमांच्या व अन्य सर्व इमारतींमध्ये अग्निसुरक्षा यंत्रणा बसविण्याबाबत.

संदर्भ : १. शासन परिपत्रक, नगर विकास विभाग क्र.अंशस-०६१२/प्र.क्र.१२९/ नवि-२०, दि.२२ जून,२०१२.
२. शासन परिपत्रक, नगर विकास विभाग क्र.अंशस-०६१२/प्र.क्र.१३०/ नवि-२०, दि.२५ जून,२०१२.
३. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.मअसे/२०१३/४६/१८३५, दि.०७.१२.२०१३.
४. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.मअसे/२०१३/३४/१७९३, दि.३०.११.२०१३.

***महोदय,***

उपरोक्त परिपत्रकानुसार सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरणे यांनी त्यांच्या अग्निशमन शासकीय/निमशासकीय/सार्वजनिक उपक्रमांची कार्यालये यांच्या अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण (Fire Safety Audit) करणे आवश्यक आहे. वरील शासन परिपत्रकानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरणे यांच्या कार्यक्षेत्रातील सार्वजनिक वापराच्या व लोकांची वर्दळ असणा-या खाजगी इमारतीचे (उदा.सिनेमा हॉल्स, नाटयगृहे, रुग्णालये, शैक्षणिक, वाणिज्यिक/व्यापारी संकुले, मॉल्स, तारांकित हॉटेल्स, मोठी व्यावसायिक कार्यालये, इत्यादी) अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण करणे बंधनकारक आहे.

०२. आपल्या कार्यकक्षेत वर नमूद केलेल्या इमारतीचे अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण (Fire Safety Audit) करण्यासाठी आपल्या विभागातील संबंधीत महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायती/ विशेष नियोजन प्राधिकरणे यांच्या अग्निशमन विभागाची मदत घेण्यात यावी. ज्या महानगरपालिका/ नगरपरिषदा/विशेष नियोजन प्राधिकरणांच्या अग्निशमन विभागात "महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम,२००९" नुसार योग्य अर्हता धारण करणारे अग्निशमन अधिकारी उपलब्ध नाहीत, तेथे सदर इमारतीचे अग्निसुरक्षा परीक्षण महानगरपालिका/नगरपरिषदा किंवा संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांनी नोंदणीकृत केलेल्या अनुज्ञप्तीधारक अभिकरणांमार्फत करुन घेणे अपेक्षित आहे. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांनी नोंदणीकृत केलेल्या अनुज्ञप्तीधारक अभिकरणांची यादी तसेच संदर्भ क्र.१ व क्र.२ वरील शासन परिपत्रके www.mahafireservice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

कृमाप.

०३. यासंदर्भात मा.राज्यमंत्री, नगर विकास यांनी विधानपरिषदेमध्ये आश्वासन दिलेले आहे. त्याअनुषंगाने आपण केलेल्या कार्यवाहीचा तात्काळ आढावा घेऊन आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व सार्वजनिक इमारतींचे अग्निसुरक्षा परीक्षण करुन आवश्यक ती आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांमध्ये काही त्रुटी असल्यास त्या अनुज्ञप्तीधारक अभिकरणांमार्फत दूर करण्याबाबत सुचना द्याव्यात. याबाबत या कार्यालयाची संदर्भ क्र.३ व ४ च्या पत्रांचे अवलोकन करावे आणि खालील मुद्दयांच्या अनुषंगाने अग्निसुरक्षा परीक्षण अहवाल या कार्यालयास पाठविण्याबाबत संबंधीतांना योग्य ते निर्देश देण्यात यावेत.

१) आपल्या कार्यक्षेत्रात किती शासकीय, निमशासकीय व सार्वजनिक उपक्रमांच्या इमारतीची अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण करुन घेण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.
२) असे निर्देश दिलेल्यापैकी किती इमारतींचे अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण झाले आहे?
३) किती इमारतींचे अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण झालेले नाही?
४) किती इमारतींनी अग्निसुरक्षा यंत्रणा बसविलेली आहे?
५) किती इमारतींना अग्निशमन यंत्रणेबाबत ना हरकत प्रमाणपत्रे देण्यात आलेली आहेत?
६) किती इमारतींनी अग्निसुरक्षा यंत्रणा बसविण्याची पूर्तता केलेली नाही?
७) याबाबत आपल्या अग्निशमन दलाने कोणती कार्यवाही केली?
८) मंत्रालयाला लागलेल्या आगीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील शासकीय निमशासकीय व सार्वजनिक उपक्रमांच्या कार्यालयामध्ये अद्ययावत अग्निशमन यंत्रणा नसल्याची कारणे काय आहेत?
९) सदर अग्निशमन यंत्रणा अद्ययावत करण्याकरिता कोणते प्रयत्न करण्यात येत आहेत?

०४. सदर विषयाचे गार्भीय लक्षात घेवून आपल्या कार्यकक्षेतील सर्व शासकीय/निमशासकीय/सार्वजनिक उपक्रम व महानगरपालिका/नगरपालिकेच्या कार्यालयातील अग्निशमन यंत्रणाबाबत (पोलिस/महसूल/सार्वजनिक बांधकाम/ जलसंपदा इत्यादी शासकीय कार्यालये/जिल्हापरिषद/ सार्वजनिक उपक्रम) संकलित करुन अग्निसुरक्षा व्यवस्थेचा अहवाल या कार्यालयास supdt@mahafireservice.gov.in या ई-मेल किंवा फॅक्स क्र.०२२-२६६६०२८७ वर तात्काळ पाठवावा, ही विनंती.

आपला विश्वासू,

(एस.एस.वारीक)
संचालक,
महाराष्ट्र अग्निशमन सेवा

प्रत : माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.
१. मा.सचिव-२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२. संचालक तथा आयुक्त, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई-४०० ०३०.
३. उप सचिव, नगर विकास विभाग (नवि-२०), मंत्रालय, मुंबई-४०००३२.
४. कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग (नवि-२०), मंत्रालय, मुंबई-४०००३२.
५. मुख्य अग्निशमन अधिकारी/अग्निशमन अधिकारी, सर्व महानगरपालिका.